Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात येथे जागतिक मृदा दिवस उत्साहात साजरा

वसंतराव नाईक कृषी व जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ येथे जागतिक मृदा दिवस दि. ०५ डिसेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डि. पार्लावार यांनी मानवी शरिराच्या आरोग्याची आपण जशी काळजी घेतो त्याचप्रमाणे शेतजमीनीची काळजी शेतकऱ्यांनी घेतली पाहीजे. देशाच्या लोकसंख्येत होणारी झपाटयाने वाढ, शहरीकरण उदयोगधंदे यामुळे शेतजमीन श्रेत्रात मोठी घट होत आहे. जागतिक हवामान बदलाचा परिणाम व अवकाळी पाऊस तापमानातील चढ—उतार यामुळे मृदेवर परिणाम होत आहे. सिंचन, रासायनिक खते, किटकनाशकांचा अमार्याद वापराने मृदा प्रदुषित होत आहे. ऊन, वारा व पाऊस जमीनीची धुप होऊन सूपिक मातीचा थर वाहून जात आहे. जमीनीचे खालावत चाललेले पोत हे आजच्या शेती समोरील मोठे आवाहन आहे. शेतीकरिता जमीनीच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यावरील उपाययोजना सदर्भात शेतकऱ्यामध्ये जाणीव निर्माण करणे हे युवा पिढीचे कर्तव्य असल्याचे विचार व्यक्त केले. समृदध शेतीकरिता माती आणि पाणी परिक्षण करूण त्यानुसार रासायनिक खतांचा वापर होणे गरजेचे आहे. तसेच जमीणीचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी माती परिक्षण करून  योग्य व्यवस्थापण करण्याची गरज असल्याचे सांगितले. शेतीला जीवंत ठेवण्यासाठी मृदेला जिवंत ठेवण्याचे आवाहणही करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी तुषार ढंगारे, साई वेमुला, प्रदिप बारड, वामशी यांनी देखील मृदा आणि शेतीचे भविष्य या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. किर्ती सिन्हा हिने केले. तर आभार प्रदर्शन प्रा. अंजली गहरवार यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे डॉ. संतोष गहूकर, सहयोगी अधिष्ठाता, अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ, प्रा. धिरज वसुले, श्री. मंगेश शेटे, सहायक कुलसचिव, डॉ. प्रशांत शिंगोटे, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, एकनाथ भंकाळे, दिपाली शिंदे, भारती मेश्राम, अस्मिता पाटील, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.